<u>**नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०१८ मधील निशाणी ११० खालील आदेश**</u>

<u>**(MHRT08-000005-2018)**</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२**. अर्जात असे कथन आहे की, मुळ प्रतिवादी क्र.०१ मयत झाल्यानंतर त्याच्या वारसांची नावे प्रतिवादी क्र.०१ (०१) ते क्र. ०१ (०४) अशी नमुद करण्यात आली आहेत. परंतु, सदर चार वारसांपैकी प्रतिवादी क्र.०१ (०२) हा मुळ प्रतिवादी क्र.०४ आहे. तसेच प्रतिवादी क्र. ०१ (०३) हा मुळ प्रतिवादी क्र.०६ आहे. प्रतिवादी क्र.०१(०४) हा मुळ प्रतिवादी क्र.०३ आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ (०२), ०१(०३) व ०१(०४) हे तीनही प्रतिवादी यापुर्वीच प्रतिवादीपणात समाविष्ठ आहेत. त्यामुळे त्यांच्या नावांची नव्याने झालेली दुरुस्ती कमी करणे गरजेचे आहे. सदर दुरुस्ती न केल्यास विनाकारण एका व्यक्तीला दोनवेळा पक्षकार व्हावे लागेल. सबब, सदरची तांत्रीक कारणाची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी विनंती करण्यात आली आहे. अर्जाच्या पृष्ठर्थ नि.१११ अन्वये शपथपत्र सादर करण्यात आले आहे.

**०३**. सदर अर्जावर प्रतिवादींतर्फे हरकत घेण्यात आली आहे की, वादीने आवश्यक नसताना सदर दाव्याचे अभिलेख वाढविले आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**०४**. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

**०५**. अभिलेखावरुन नि.६८ वरील आदेशान्वये प्रतीवादी क्र.०१ मयत झाल्यानंतर त्याचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.०१(०१) ते ०१(०४) यांना दाव्यात समाविष्ठ केल्याचे दिसून येते. परंतु, प्रतिवादी क्र.०१(०२) हा प्रतिवादी क्र.०३, प्रतिवादी क्र.०१(०३) हा प्रतिवादी क्र.०६ व प्रतिवादी क्र.०१(०४) हा प्रतिवादी

क्र.०३ म्हणून दाव्यात समाविष्ठ असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रतिवादींना दाव्यात दोनवेळा प्रतिवादीपणात समाविष्ठ केल्याचे दिसून येते. नि.६८ वरील अर्ज देताना वादीने सदरची बाब पाहणे आवश्यक होते. परंतु, तसे झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे विनाकारण दाव्याचे अभिलेख व सदर प्रतिवादी दाव्यात समाविष्ठ असताना नि.६८ वरील आदेशान्वये मयताचे वारस म्हणून त्यांना नोटीस काढण्याचे अनावश्यक ती प्रक्रिया वादीने राबविल्याचे दिसून येते.

**०६.** त्यामुळे सदर प्रतिवादींना वारस म्हणून नव्याने दाव्यात समाविष्ठ केलेली नावे कमी करणे गरजेचे आहे. परंतु, अर्ज मंजूर करताना वादीने न्यायालय व विरुध्द पक्षकारांचा वेळ वाया घालविल्याची बाब दुर्लक्षीत करुन चालणार नाही. सबब, खर्चाच्या अटीवर सदर अर्ज मंजूर करणे गरजेचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज निशाणी ११० हा प्रतिवादी क्र. ०३ ते ०६ यांना एकत्रीतपणे रक्कम रुपये ३००/– व मा. जिल्हा विधीसेवा समिती, रत्नागिरी यांच्याकडे रक्कम रुपये ३००/– इतका खर्च भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** आदेशान्वये वादीने मुदतीत पूर्तता करावी.

**३.** आदेशाची पुर्तता केल्यानंतर वादीने अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती मुदतीत करुन त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.03 16:12:58 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक ०३.०९.२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,**

**देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

| -: **C E R T I F I C A T E** :- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | K.V. Vaje (Jr. Clerk) |
| Court Name | : | The Court of Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 03/09/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 03/09/2025 |
| Order uploaded on | : | 03/09/2025 |